॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक १९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


✲ सुविचार ✲

जीवनातला अंध:कार नाहीसा करणारी ज्योत म्हणजे हास्य !






# कोणत्याही ॲक्शनसाठी भारतीय सैन्यदल सज्ज

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंग पंतप्रधानांना भेटले । तिन्ही दलांच्या तयारीची दिली माहिती

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतापाची लाट आहे. या हल्ल्यास जशात तसे उत्तर द्यावे, अशी मागणी होत आहे. त्यामुळे भारत सरकारनेही पाकिस्तान विरोधात कठोर पावले उचलली असून, प्रत्युत्तरादाखल पाकिस्ताननेही भारताविरोधात काही कठोर निर्णय घेतले आहेत. मात्र, भारताने पाकिस्तानवर अधिक दबाव वाढवला आहे. त्यातच आज संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत तिन्ही सैन्य दलाच्या तयारीची माहिती दिली असून, भारतीय भूदल, नौदल आणि वायू दलही सज्ज असल्याचे सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली.

भारताने पाकिस्तानवर दबाव वाढविला आहे. त्यामुळे पाकिस्तानवर कोणत्याही क्षणी हल्ला होऊ शकतो, अशी भीती पाकिस्तानला वाटत आहे. त्यामुळे पाकिस्तानातही वेगवान हालचाली सुरू आहेत. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना मातीत गाडण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असतानाच



आज संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाल्याचे समजते. या बैठकीत भारतीय सैन्याच्या तयारीची सविस्तर माहिती दिली. सूत्रांच्या माहितीनुसार भारताची भूदल, नौदल आणि वायूदल अशी तिन्ही दले सज्ज आहेत, असे राजनाथ सिंग यांनी मोदी यांना सांगितले. त्यामुळे आता मोदी सरकार पाकिस्तानविरोधात काय निर्णय घेते, याकडे लक्ष असणार आहे.

भारताने आपली तिन्ही दले सज्ज ठेवली आहेत. या तिन्ही दलांकडून आपापल्या पद्धतीने युद्धाभ्यास केला जात आहे. दुसरीकडे भारत–पाकिस्तान सीमेवरही गस्त आणि सैनिकांची संख्या वाढवण्यात आली आहे. पाकिस्तानने काही कुरापती केल्याच तर त्याला जशास तसे उत्तर देण्याची तयारी भारताने ठेवली आहे. सध्या तरी भारताने सबुरीची भूमिका घेतली आहे. अशात पाकिस्तानने दगाबाजी केल्यास युद्धजन्य स्थिती निर्माण होऊ शकते.

### पाकला हल्ल्याची भीती

■ पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानने भारताच्या लष्करी कारवाईची चांगलीच धास्ती घेतली असून, पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांना लाँच पॅड येथून हटवून सुरक्षितस्थळी पाठवायला सुरुवात केली आहे. बहावलपूर येथील जैश–ए–मोहमद आणि मुनीरके येथील लष्कर–ए–तोयबाच्या मुख्यालयातून अतिरेक्यांना सुरक्षितस्थळी हलविले जात आहे. सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकमध्ये अतिरेक्यांना वाचविणे हे पाकसमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. त्यामुळे पाकव्याप्त काश्मिरात अतिरेकी गबाळ गुंडाळत असल्याचे चित्र आहे.

### हल्लेखोर खोऱ्यातच, लष्कराकडून पाठलाग

■ पहलगाममध्ये हल्ला केलेल्या दहशतवाद्यांचा पाठलाग भारतीय लष्कराकडून केला जात आहे. गेल्या ५ दिवसात ४ वेळा त्यांचे लोकेशन लष्कराने शोधून काढले. चारही वेळा हे दहशतवादी दाट जंगलातून पळाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. हल्लेखोर अजूनही काश्मीरच्या खो–यात असल्याचे सूत्रांनी सांगितले. काश्मीरच्या या दाट जंगलात सध्या या दहशतवाद्यांचा शोध युद्ध पातळीवर सुरू आहे.

पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी आम्ही आमच्या सेनेची मोर्चेबांधणी केली आहे. आम्ही कोणत्याही परिस्थितीस तयार आहोत. भारतीय सैनिक कोणत्याही क्षणी हल्ला करू शकतात, असे म्हटले आहे.

## SPOT NEWS

### लेक यूपीएससी पास, पेढे वाटताना वडिलांना हार्टअटॅक

**● यवतमाळ –** केंद्रीय लोकसेवा परीक्षेचा निकाल जाहीर झाला. लेक यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचं कळताच पेढे वाटत आनंदोत्सव साजरा करताना वडिलांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यातच त्यांचे निधन झाल्याची दुःखद घटना घडली . यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातल्या वागद (इजारा) येथे घडलेल्या या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे. प्रल्हाद खंदारे असे मृत्यमुखी पडलेल्या वडिलांचे नाव आहे .यूपीएससीच्या निकालानंतर मोहिनी प्रल्हाद खंदारेच्या वडिलांच्या निधनाने संपूर्ण खंदारे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चांगली रँक मिळवत मोहिनी खंदारे या तरुणीनं कुटुंबीयांची मान उंचावली खरी मात्र आपल्या यशाचा आनंद साजरा करणाऱ्या वडिलांवर काळाने घाला घातल्याने मोठे यश आयुष्यभराचं दुःख देऊन जाणारं ठरले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात मोहिनी प्रल्हाद खंदारे हिला ८८४ रँक मिळाला. मुलगी प्रशासकीय अधिकारी होणार या बातमीने सुखावलेल्या वडिलांनी गावकऱ्यांना पेढे वाटायला सुरुवात केली. ग्रामस्थांना पेढे वाटतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. यातच त्यांचा मृत्यू झाला.

### ३५ चेंडूत झळकावले वादळी शतक

**● जयपूर –** आयपीएल २०२५ स्पर्धेतील आज ४७ व्या सामन्यात १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी गुजरात टायटन्सच्या अनुभवी गोलंदाजांवर चांगलाच तुटून पडला आणि त्याने अवघ्या ३५ चेंडूत वादळी शतक झळकावून इतिहास रचला. आयपीएलच्या इतिहासात वेगवान शतक झळकावणारा सर्वांत युवा आणि पहिला भारतीय ठरला. त्याने युसूफ पठाण याचा विक्रम मोडित काढला. युसूफ पठाणने ३७ चेंडूत शतक झळकावले होते. राजस्थान रॉयल्सच्या युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशीने आज गुजरात टायटन्सविरोधात मोहमद सिराज, इशांत शर्मा आणि राशिद खानसारख्या अनुभवी गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला.

# राज्यात 'हाय अलर्ट'!

**● मुंबई । वीरभूमी–**

काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात हाय अलर्ट असून ठिकठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक ठिकाणांवरील सुरक्षा व्यवस्थाही अधिक कडक करण्यात आली आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस वर गावी जाणाऱ्या प्रवाशांची तोबा गर्दी झाली आहे, त्या अनुशंगाने सुरक्षा वाढवण्यात आली असून विषेश व्यवस्था करण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी दुपारी जम्मू–काश्मीरच्या पहलगाम येथे फिरायला गेलेल्या पर्यटकांवर काही दहशतवाद्यांनी गोळीबार करत क्रूर हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांनी जाव गमावला तर अनेक जखमी झाले. दहशतावाद्यांच्या या नृशंस कृतीमुळे संपूर्ण देशात संतापाचे वातावरण असून जगभरातूनही या हल्ल्याचा निषेध होतोय. हल्ल्यानंतर भारताने कडक पावल उचलत कठोर भूमिका घेतली.

भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या देशात पाठवण्याची प्रक्रियाही सुरू झाली असून पाकिस्तानातील भारतीयांना १ में पर्यंत मायदेशी परतण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावर एकूण १३९ रेल्वे स्थानके आहेत, जिथून दररोज सुमारे ३,२०० लोकल गाड्यांची वाहतूक होते. यामुळे दररोज सुमारे ७५ ते ८० लाख प्रवासी प्रवास करतात.

# एसटी महामंडळाची आर्थिक श्वेतपत्रिका काढा : सरनाईक

**● ठाणे । वीरभूमी–**

एसटी महामंडळाचा सुमारे १० हजार कोटींचा संचित तोटा असून एसटीचे आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसेच भविष्यातील नियोजन करता, एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत.

सोमवार दि. २८ एप्रिल रोजी एसटीच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीमध्ये प्रताप सरनाईक बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख यांच्यासह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते. सरनाईक म्हणाले की, सुमारे दहा हजार कोटी संचित तोटा सहन करणाऱ्या एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहन खरेदी, टायर खरेदी, इंधन खरेदी, स्थानकाचे नूतनीकरण व इतर आस्थापना खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत करावी लागत आहे.

कर्मचाऱ्यांचे देणी, भविष्य निर्वाह निधीचे हप्ते, कामगार करारातील प्रलंबित देणी यासाठी महामंडळाला पैशाची गरज आहे. याबरोबरच महामंडळाला इंधन, वस्तु व सेवा पुरविणाऱ्या संस्थांची थकीत देणी या सर्व घटकांचा विचार करून एसटी महामंडळाला सध्या किती उत्पन्न मिळते? किती खर्च येतो? तसेच किती देणी बाकी आहेत. या सर्वांचा लेखा–जोखा मांडणारी एक श्वेतपत्रिका काढणे अत्यंत आवश्यक असून त्यातून एक आर्थिक शिस्त निर्माण करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

नुकत्याच संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहाला आश्वासित केल्याप्रमाणे १,३१० बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या एकूण प्रकरणाची चौकशी तटस्थ व्यक्ती मार्फत केली जाईल, तशा सूचना अतिरिक्त मुख्य सचिव(परिवहन) यांना देण्यात येतील अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिली.

कर्नाटक परिवहन महामंडळाच्या धर्तीवर सर्व कर्मचाऱ्यांना एकाच छताखाली वैद्यकीय सेवा सुविधा व वैद्यकीय चाचण्या करून मिळतील अशी कॅशलेस मेडिक्लेम योजना धर्मवीर आनंद दिघे यांच्या नावाने सुरू करावी असे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी एसटी प्रशासनाला दिले.

लांब पल्ल्याच्या प्रवासामध्ये एसटी बसेस ज्या हॉटेल–मोटेल वर थांबतात, तेथे प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांबाबत अनेक तक्रारी निर्माण होत असून या हॉटेल–मोटेलना परवानगी देत असताना यापुढे कडक धोरण स्वीकारले जाईल. ज्यामध्ये प्रवाशांच्या तक्रारी नुसार संबंधित हॉटेलवर दंडात्मक कारवाई बरोबरच त्यांचा थांबा रद्द करण्याची देखील तरतूद असणार आहे.

# काविळीने तरुणीच्या मृत्यूनंतर राजूर ग्रामस्थांचा ग्रामपंचायतीवर मोर्चा

## उपाय योजना करता येत नसतील तर सदस्यांनी राजीनामा देण्याची मागणी

**● अकोले । वीरभूमी –**

तालुक्यातील राजुर गावात काविळीची साथ मोठ्या प्रमाणावर पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या साथीमुळे एका २० वर्षीय तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने ग्रामस्थांचे संतापाचे वातावरण चिघळले आहे. संतप्त ग्रामस्थांनी सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढून जोरदार घोषणाबाजी करत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा निषेध नोंदविला.

ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त करत गावात तातडीने आरोग्य सुविधा उपलब्ध कराव्यात, स्वच्छतेची योग्य व्यवस्था करावी तसेच साथीवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली. मोर्चादरम्यान ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, आरोग्य विभागाने गावात आपत्कालीन पथके रवाना करून तपासणी मोहीम सुरू केली आहे. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. कावीळ आजाराचा प्रादुर्भाव झाल्यानंतर राजूरकरांचा येथील ग्रामस्थांचा ग्रामपंचायत कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.

कावीळ आजाराचा मागील पंधरा दिवसांपासून प्रादुर्भाव झाल्यानंतर या आजारात शनिवारी एका तरुणीचा बळी गेल्यानंतर आणि ही साथ अद्यापही आटोक्यात न आल्याने राजूर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

यावेळी माजी सरपंच गणपतराव देशमुख, संतोष मुर्तडक, गंगाराम धिंदळे, अविनाश बनसोडे, निलेश साकुरे, दौलत देशमुख, गोकुळ कानकाटे, गणपत देशमुख, लता सोनवणे, ॲड. दत्तात्रय निगळे, संतोष नांदवाणी, अनंत घाणे, सचिन देशमुख, किशोर देशमुख यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या.

पाण्याचे जार आणि बिसलेरी बॉटल संपल्या, अनेक गोर गरीब नागरिकांचे कुटुंबातील सदस्य कावीळ आजाराने रुग्णालयात उपचार घेत आहेत. प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा निषेध, आरोग्य विभागाने एक पथक येथे काही दिवस ठेवा. ग्रामपंचायत सरपंच आणि उपसरपंचांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी निलेश साकुरे यांनी केली.

संतोष मुर्तडक यांनी आमच्या भावना बोथट झाल्या की काय? असा प्रश्न उपस्थित केला. आम्हाला फक्त पाणी हवे आहे, दिवसाआड पाणीपुरवठा होत असतो मात्र पाणीपट्टी वर्षाची भरावी लागते. पंधरा दिवसांपासून कावीळची साथ सुरू असताना ग्रामपंचायतची एकही बैठक झाली नाही. याबाबत खेद व्यक्त केला. प्रशासन गावाला शुद्ध पाणीपुरवठा करू शकत नाही तर तुम्ही राजीनामे द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. ग्रामपंचायतचा कारभार बोगस पद्धतीने सुरू असून भष्टाचार



होत असल्याचा आरोप त्यांनी केला. करण्यात आलेल्या विकास कामांची चौकशी करा. फिल्टरेशन प्लांट बंद करून डायरेक्ट नदीतून येणारे पाणी सोडले जाते. मेडिकलोअर पुरविण्याचे जाहीर केले मात्र अद्यापही घरोघर हे मेडिकलोअर पोहचले नाही. निवडणुकीतील आश्वासने विसरले तरी चालेल मात्र ग्रामस्थांना शुद्ध पाणी पुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी केली. आजारी रुग्णांची जबाबदारी ग्रामपंचायतने घ्यावी, असे आवाहन केले. अन्यथा पुन्हा जोरदार आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

# SPOT NEWS

## रिल बनवण्याच्या बहाण्याने मित्राला ३२ लाखांचा गंडा

**● नगर । वीरभूमी–**

पैशांसोबत रिल्स काढण्याच्या बहाण्याने एकाने मित्राची तब्बल ३१ लाख ७० हजारांची रोकड घेवून पोबारा केल्याची घटना नगरमध्ये घडली आहे. याबाबत श्रेयश पांडुरंग लटपटे (वय २३, रा. भायगाव, ता. शेवगाव) या तरुणाने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी श्रेयश हा आनंद मशिनरी ॲण्ड इलेक्ट्रिकल्स या फर्ममध्ये मॅनेजमेंटचे काम पाहतात. या फर्मकडे पाईप डिस्ट्रीब्युशनची डिलरशीप आहे. त्यांच्या फर्मच्या अहिल्यानगर, अकोला व इतर ठिकाणी बँच आहेत. या सर्व ठिकाणीच्या रकमेचे कलेक्शन करण्याचे काम फिर्यादी श्रेयश करतात. २४ एप्रिल रोजी त्यांनी कारंजा, मालेगाव, मेहकर येथील दुकानदारांकडून रोख रकमेचे कलेक्शन केले व ३१ लाख ७० हजारांची रोकड घेवून ते नगरला येत होते. त्यावेळी त्यांना त्यांचा मित्र सुजित राजेंद्र चौधर (रा. निपाणी जळगाव, ता. पाथर्डी) याचा फोन आला. फोनवर चौधर म्हणाला, तुझ्याकडे रोकड आहे का? मला रोकड सोबत रिल्स काढायची आहे. त्यावेळी फोन करणारा हा ओळखीचा मित्र असल्याने श्रेयश याने रोकड असल्याचे सांगितले. त्यामुळे सकाळी ९ च्या सुमारास दोघे एमआयडीसी येथील सनफार्मा चौकात भेटले. तेथून ते सुजित चौधर याच्या मारुती सियाझ कार (क्र. एमएच १६ बीएच ४७९९) मध्ये बसून शेंडी बायपास रोडवर गेले. तेथे गेल्यावर आरोपी चौधर हा फिर्यादी श्रेयश यांना म्हणाला की, तू समोर उभ्या असलेल्या गाडीतून कॅमेरा घेवून ये. त्यावेळी श्रेयश याने त्याच्या जवळील रोकड असलेली बॅग मारुती सियाझ कारच्या सीटवर ठेवून तो कॅमेरा आणण्यासाठी गेला. त्याच वेळी आरोपी चौधर याने कार सुरु करून तो भरधाव वेगात ३१ लाख ७० हजारांची रोकड असलेली बॅग घेवून पसार झाला. श्रेयश याने त्याला वारंवार फोन केला मात्र त्याने फोन उचलला नाही. फसवणूक झाल्याचे श्रेयश यांच्या लक्षात आल्यावर २५ एप्रिलला सायंकाळी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी आरोपी चौधर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## ट्रक चालकावर टोळक्याचा हल्ला

**● नगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर- सोलापूर रस्त्यावरील शिरढोण (ता. अहिल्यानगर) गावच्या शिवारात आणि वडगाव तांदळी येथील रामवाडी रस्त्यावर ट्रक चालकावर १० ते ११ जणांच्या टोळक्याने अचानक हल्ला केला. वैभव अशोक घिगे (वय ३१ रा. वडगाव तांदळी) असे हल्ला झालेल्या ट्रक चालकाचे नाव आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी (२५ एप्रिल) रात्री १०:३० ते १०:४५ वाजताच्या दरम्यान ही घटना घडली आहे. सोहम निमसे, अभिषेक निमसे, आकाश पवार (पूर्ण नावे माहिती नाही, सर्व रा. साकत खुर्द, ता. अहिल्यानगर) व इतर सात ते आठ अनोळखी इसम यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. वैभव घिगे शुक्रवारी रात्री १०.३० च्या सुमारास आपला टाटा टेलर (एमएच १२ एफझेड ७८४१) घेऊन अहिल्यानगर-सोलापूर रस्त्याने जात होते. त्यावेळी शिरढोण गावच्या शिवारात सोहम निमसे याने आपल्या पिकअप वाहनाने टेलरसमोर अचानक ब्रेक दाबला व वाहन धीम्यागतीने चालवू लागला. वैभवने दोन ते तीन वेळा हॉर्न वाजवल्याचा राग आल्याने सोहम निमसे, अभिषेक निमसे, आकाश पवार व अन्य सात ते आठ अनोळखी इसमांनी वैभवला अडवले व शिवीगाळ करून मारहाण केली.

# भूजल क्षमता वाढीसाठी बंधाऱ्यातील गाळ काढणे चांगला उपाय

## आ. मोनिका राजळे । भगूर येथील साबळे वस्ती बंधाऱ्यातील गाळ काढण्याचा शुभारंभ

**● शेवगाव । वीरभूमी–**

बंधाऱ्यातील गाळ काढणे व तो शेती सुपिकतेसाठी वापरणेस गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही महत्वकांक्षी योजना मर्यादित न ठेवता राज्यात कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. बंधाऱ्यातील गाळ काढून त्याचे खोलीकरण करणे हे भूजल क्षमता वाढवण्यासाठी एक चांगला उपाय असल्याचे प्रतिपादन आ. मोनिका राजळे यांनी केले.

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील ८३ पाझर तलाव, बंधारेतील गाळ काढण्यासाठी ४ कोटींचा निधी प्राप्त करून घेताच आ. राजळे यांनी या कामांची प्रत्यक्षात सुरुवात केली. सोमवार दि. २८ रोजी भगुर येथील साबळे वस्ती येथील बंधाऱ्यातील गाळ काढण्याचा शुभारंभ केल्यानंतर आ. राजळे बोलत होत्या.



यावेळी नगरसेवक अशोक आहुजा, सागर फडके, गणेश कोरडे, शिवसेना तालुका प्रमुख आशुतोष डहाळे, राजाभाऊ लड्डा, मनसे तालुकाध्यक्ष गणेश रांधवणे, कचरू चोथे, वरूरचे सरपंच सचिन म्हस्के, ज्ञानेश्वर खांबट, गणेश म्हस्के, सुधाकर मुरदारे, संभाजीराव जायभाये, ह.भ.प. चंद्रशेखर मुरदारे, किरण मुजमुले, राधाकिसन म्हस्के, दशरथ म्हस्के, हनुमान मुरदारे, कल्याण मुरदारे, अनिल साबळे, सुनिल पाटील, फिरोज शेख, जलसंधारण उपअभियंता प्रविण दहातोंडे, सहाय्यक अभियंता विवेक जाधव, नाम फाऊंडेशचे संग्राम खलाटे, नवनाथ खलाटे, प्रशांत तेलोरे आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार मोनिका राजळे म्हणाल्या की, नाम फाऊंडेशन व राज्य शासनाने हे काम हाती घेतले असुन यामध्ये लोकसहभाग महत्वाचा आहे.बंधाऱ्यामधील गाळ काढल्याने पाणी साठवण क्षमता वाढते. तसेच खाली पडणारे पाणी जमिनीमध्ये मुरून भूगर्भातील पाण्याच्या साठ्यात भर पडते आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होते. भूजल क्षमता वाढवण्यासाठी हा एक चांगला उपाय आहे.

शेवगाव तालुक्यात या योजनेअंतर्गत वरूर खु., वरूर बु., भगुर, बोधेगाव, ढोरजळगाव, सालवडगाव, ठाकुर पिंपळगाव, चापडगाव, राक्षी या गावामध्ये ६४ लाख रुपये निधीतून बंधारे, तलावाचे खोलीकरणाचे काम होणार आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौरव मुरदारे यांनी केले तर तुषार पुरनाळे यांनी आभार मानले.

## पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याचा तृतीयपंथी यांच्यावतीने तीव्र निषेध

**● नगर । वीरभूमी–**

काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम जवळील बायसरण परिसरात झालेल्या अमानवी व भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तृतीयपंथी समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला व या हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शन करून प्र.निवासी जिल्हाधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देताना तृतीयपंथी समाजाचे अध्यक्ष काजल गुरु समवेत लैला गुरु, सना, गौरी, फिजा, दिया, मीनाक्षी, मोहिनी, अदा, शिवण्या, रिजवाना, सुलताना, मीरा, आयत, रोशनी, तेजू, मनू, मीना, संध्या गुरु, मोहनी, साधना, शुभांगी, आकांक्षा आदीसह तृतीयपंथी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, जम्मू काश्मीर पहेलगाम येथे फिरण्यासाठी गेलेले नागरिक हे महाराष्ट्र व विविध राज्यातून आले होते मात्र दहशतवादी हल्ल्यानंतर तेथे अडकून पडले व त्यांना घर वापसी साठी काही विमान कंपन्यांकडून ४० ते ५० हजार रुपये तिकिटासाठी घेतले हे तिप्पट पैसे वसूल करण्यात आले ही दुर्दैवी बाब असून ही दुसरी लूट आहे या लुटारू विमान कंपन्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व याच्याहून पुढे शासनाने मोफत सुविधा देण्यात यावी तसेच या संपूर्ण मनमानी तिकीट दर वाढीला निर्बंध लावण्यात यावे या मागणीसाठी व दहशतवादी हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

पुढे काजल गुरु म्हणाले की, आम्ही जम्मू काश्मीर येथे सहा तृतीयपंथी अडकून पडलो त्यानंतर आमदार संग्राम जगताप यांच्याशी संपर्क साधून यांनी मदत केली व जम्मू काश्मीर येथे गिरीश महाजन यांनी भेट घेऊन माझी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यातून आम्ही परतलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच विविध राज्यातून आलेले पर्यटकांकडून तिप्पट तिकीट दर घेतले. शासनाने मोफत सेवा दिली पाहिजे होती, अशी भावना व्यक्त केली.

## संजीवनी युवा प्रतिष्ठानतर्फे नगरपालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सहकारमहर्षी स्व. शंकरराव कोल्हे मोफत फिरता दवाखान्याच्या माध्यमातून नगरपालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत नगरपालिका कार्यालय येथे हे शिबिर पार पडले. यात शेकडो कर्मचारी बंधू भगिनींची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात स्वच्छता कर्मचाऱ्यांची सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यांच्यावर प्राथमिक वैद्यकीय उपचार देण्यात आले तसेच गरजेनुसार पुढील उपचारांसाठी मार्गदर्शनही करण्यात आले. स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य सशक्त राहावे व त्यांच्या कुटुंबीयांचीही काळजी घेता यावी, या हेतूने या शिबिराचे आयोजन केले गेले होते. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याविषयी जागृती वाढली असून, त्यांच्या



आरोग्य संरक्षक धोरणाला बळकटी मिळाली आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान, डी. आर. काले, वैभव आढाव, रवीअण्णा पाठक, खालिक भाई कुरेशी, रोहित कनगरे यांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्याधिकारी सुहास जगताप, उपमुख्याधिकारी मनोज कुमार पापडीवाल, कार्यालय पर्यवेक्षक ज्ञानेश्वर चाकणे, स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता रूपाली भालेराव, आरोग्य निरीक्षक सुनील अरण, राजेंद्र पुजारी, किरण जोशी, पायमोडे मॅडम,बाळू दिघे, जावेद शेख, प्रशांत उपाध्ये, रामनाथ जाधव आणि प्रवीण पठाडे, स्वप्नील जाधव आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण शिबिरात स्वच्छता कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांना आरोग्याविषयी सल्ला, आहार, दिनचर्या व मानसिक आरोग्य यासंबंधी महत्त्वपूर्ण मार्गदर्शनही देण्यात आले.

संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून विशेष अभिनंदन होत असून, भविष्यातही विविध आरोग्य व सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करून अधिकाधिक लाभदायक कार्य केले जाईल, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

# सध्या सत्तेत येण्यासाठी जाती धर्माला प्राधान्य : ॲड. प्रकाश आंबेडकर

**● अकोले । वीरभूमी–**

सध्या देशात सत्तेत येण्यासाठी सोपा मार्ग अवलंबला जातो, तो म्हणजे जाती-जातीत, धर्मा-धर्मात वाद लावणे, भांडणे लावणे, इतिहासात जात धर्माला प्राधान्य दिल्याने आपण पारतंत्र्यात गेलो. धर्म जात ही व्यक्तिगत बाब असली पाहिजे मात्र आज देशात जात-धर्माला प्राधान्य आले. आजच्या सरकारने नवीन पिढीचे तारुण्य बरबाद करण्यासाठी जात-धर्म पुढे आणले असल्याचा घणाघात ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला.

अकोले तालुक्यातील कोतुळ येथे २७ एप्रिल १९४१ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सभा झाल्यानंतर ८४ वर्षांनी पदस्पर्श भवन येथे त्याचे नातु ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर हे कोतुळ येथे आले होते. रविवारी सकाळी गावातून त्यांची भव्य मिरवणुकीने स्वागत करण्यात आले. गावात चौकाचौकात त्याचे स्वागत करण्यात आले. यावेळी भाऊदाजी देशमुख यांच्या निवासस्थानी व विद्यालयाला भेट देवून जान्हवी लॉन्स येथे जाहिर सभा पार पडली. याप्रसंगी ॲड. प्रकाश आंबेडकर बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. संघराज रुपवते होते. यावेळी व्यासपीठावर आ. डॉ. किरण लहामटे, विजयराव वाकचौरे, बाळासाहेब नानासाहेब देशमुख, उद्योजक सुधीर साळवे, या कार्यक्रमाचे आयोजक उत्कर्षाताई रुपवते, रविंद्र देशमुख, राजेंद्र देशमुख, सुरेश देशमुख, शांताराम संगारे, ॲड. सागर शिंदे, राजेंद्र गवांदे, सुरेशराव देठे, बाळासाहेब साबळे आदीसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

ॲड. आंबेडकर म्हणाले की, आज आपले सैन्य पूर्णपणे तयार आहे. मात्र, आपल्या पॉलिटिकल लीडरशिपची ती इच्छा दिसत नाही. यासाठी २ मे २०२५ रोजी आपण हुतात्मा स्मारकासमोर निदर्शने करणार आहोत. या सरकारकडे काही करण्याची इच्छा शक्ती राहिलेली नाही. भाजपा हाच दहशतवादी विचाराचा पक्ष आहे. काश्मिर मधील आजही ६० टक्के कश्मिरी भारताबरोबर आहेत तर १५ % स्वतंत्र मागत आहेत. केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारत देश सोडण्याचे आदेश दिले. अटारी व वाघा बॉर्डर १ मेपर्यंत बंद ठेवण्याचे निर्णय घेतले. हा चांगला निर्णय आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते यांनी कोतूळ गावातील ज्या शासकीय विश्रामगृहावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्रांतीस थांबले होते, ती वास्तू दयनीय अवस्थेत असून त्याचा जिर्णोद्धार करून त्यासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी



आमदार डॉ. किरण लहामटे व ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याकडे केली. तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महिला परिषदेला उजाळा दिला.

सूत्रसंचालन पोपटराव सोनवणे व अजय पवार यांनी केले तर संदीप बर्वे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पदस्पर्श समितीचे अध्यक्ष गौतम रोकडे, सुरेश जगधने, नवनाथ वैराळ, प्रवीण साळवे, गणेश साळवे, पोपटराव सोनवणे, संदीप बर्वे, प्रसिक सोनवणे, साळवे पेंटर, प्रकाश डोळस, रवींद्र देठे, सचिन व अविनाश गायकवाड, जे. के. वैराळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी समाजाप्रती २४ तास सेवा देणारे डॉ. सोमनाथ मुटकुळे, डॉ. प्रदीप जोशी, डॉ. संतोष संगारे, डॉ. शिवाजी सोनवणे, डॉ. राजीव शिंदे, डॉ. भांडकोळी यांचा प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, संविधान पुस्तिका देऊन सन्मान करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तर चित्रकार गौतम साळवे यांनी प्रकाश आंबेडकर यांना त्यांचे रेखाटलेले चित्र देण्यात आले. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या कोतूळ येथील विश्रामगृहाला स्मारक म्हणून विकसित करण्याची जी प्रक्रिया आहे ती तातडीने सुरू करू त्याचा विकास आराखडा तयार करून योग्य ती कार्यवाही करू अशी ग्वाही दिली.

माझे आजोबा स्व. भाऊ दाजी देशमुख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या काळात जो समतेचा संदेश समाजाला दिला तशाच प्रकारचा संदेश बाबासाहेबांची तिसरी व आमची चौथी पिढी एकत्रित आलो आणि समतेचा पुन्हा संदेश दिला. याचा सर्व कुटुंबियांना अभिमान असल्याचे रवींद्र देशमुख यांनी सांगितले.

### सिंधू जलवाटप करार रद्द नाही, सरकार खोटं बोलतयं

■ जलयुद्ध पुकारून सिंधू जलवाटप कराराला स्थगिती दिल्याचे केंद्र सरकारकडून सांगण्यात येत असले तरी देखील भारत सरकार सिंधू जलवाटप करार रद्द केल्याबद्दल खोटं सांगून जनतेची दिशाभूल करीत आहे. या कार्यक्रमानंतर पत्रकार परिषदेत ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी माध्यमांसमोर भारत सरकारकडून सिंधू जलवाटप करारांतर्गत पाकिस्तानला पाणी बंद केल्याच्या संदर्भान दिलेले पत्रच दाखवले. यात पाकिस्तानला जाणारे पाणी बंद केल्याचा उल्लेख नाही. आम्ही धरणातील पाणी सोडणार नाही, असाही उल्लेख नाही. याचाच अर्थ इंडस करार भारत सरकारने रद्द केलेला नाही. असा आरोप ॲड. आंबेडकर यांनी केला.

## SPOT NEWS

### नगरमध्ये १ मे कामगार दिनी कामगारांचा भव्य मेळावा

**● नगर । वीरभूमी–**

दिनांक १ मे जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या औचित्य साधून अहिल्यानगर मध्ये भव्य कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत जिल्हा शिवसेनाप्रमुख बाबूशेठ टायरवाले यांनी दिली. नगर जिल्हा मजदूर सेना, राष्ट्रीय कर्मचारी सेना, स्वराज कामगार संघटना यांच्या वतीने व जिल्ह्यातील सर्व कामगार संघटनेच्या वतीने १ मे रोजी सकाळी ९.३० वाजता माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी, अहिल्यानगर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे. सदर मेळाव्यास पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम भैय्या जगताप, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार काशिनाथ दाते सर, सहाय्यक कामगार आयुक्त रेवननाथ भिसले, अहिल्यानगर, शिवसेनाजिल्हाप्रमुख अनिल शिंदे व सर्व पक्षाचे पदाधिकारी, कामगार नेते यांच्या उपस्थितीत होणार आहे. सदर कार्यक्रमात कामगारांची कामातील नियमतता, कामावरील उपस्थिती व कंपनीत, सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना विशेष पुरस्कार देऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

### जुलै अखेर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अरण तीर्थक्षेत्राच्या विकासाचा होणार शुभारंभ

**● नगर । वीरभूमी–**

संतश्रेष्ठ सावता महाराजांच्या अरण तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा येणाऱ्या कॅबिनेटमध्ये मंजूर करून २४ जुलै च्या अगोदर सर्व प्रशासकीय आणि कायदेशीर बाबींची पूर्तता करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन करण्याचा शब्द ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्याबद्दल अहिल्यानगर जिल्ह्यातील संत सावता माळी क्रांती परिषदच्या वतीने या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे. शाहू, फुले आंबेडकराच्या महाराष्ट्रामध्ये महापुरुषांच्या स्मारकांसाठी आणि साधूसंतांच्या धार्मिक स्थळांसाठी शासन निधीची कमतरता भासू देणार नसल्याचेही आश्वासन जयकुमार गोरे यांनी दिले. तर ही आमची ऊर्जास्थाने, शक्तीपीठे असून यांचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. अरण (ता. माढा, सोलापूर) येथे आयोजित चंदन उटी कार्यक्रम आणि भक्त परिवाराच्या मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते. ७३० वर्षाच्या धार्मिक परंपरेचा वारसा असणाऱ्या संत सावता महाराजांच्या अरण नगरीचा विकास आजपर्यंत झाला नाही याची खंत व्यक्त करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाला गती दिल्याचे सांगून या अगोदरच्या सत्ताधाऱ्यांवरती त्यांनी निशाणा साधला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मठिकाणा चा विकास करण्यासाठी दहा एकर क्षेत्र विकत घेत १४५ कोटी रुपये ची तरतूद केली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कडगुण या जन्मस्थळाचेही स्मारकांमध्ये रूपांतर करण्यासाठी शासन प्रयत्न करत असल्याची माहिती दिली. याप्रसंगी आमदार अभिजीत पाटील, रंजनभाऊ गिरमे, रणजीतसिंह शिंदे, रमेश बारस्कर, शिवाजी कांबळे, भारत शिंदे, निलेश गिरमे, प्रसाद डोके, राजकुमार हिवरकर, संतोष पाटील, मनोहर डोंगरे, शंकरराव लिंगे, प्रकाश गोरे, निशिगंधा माळी, पोपटराव बारवकर, योगेश पाटील यांच्यासह संत सावता महाराजांचे वंशज सावता महाराज वसेकर, प्रभू महाराज माळी अमर हजारे, साखरचंद लोखंडे महाराज, आबासाहेब खारे, नगरसेवक अजिनाथ माळी, पांडुरंग शिंदे, सुर्यकांत गोरे, गणेशभाऊ बनकर, संतोष विधाते यांच्यासह नगर जिल्हा व तालुका कार्यालयाचे सर्व अधिकारी आणि संपूर्ण महाराष्ट्रातील संत सावता माळी महाराज भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाहनाच्या धडकेने सैनिकांच्या स्मृती स्तंभाचे तुकडे

## पाथर्डी शहरातील स्मृतीस्तंभाची विटंबना । पुनर्वसनाबाबत झालेली चर्चा ठरली पोकळ

**● पाथर्डी । वीरभूमी–**

राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या बसस्थानक परिसरातील सैनिकांच्या स्मृती प्रित्यर्थ ब्रिटिश कालावधीमध्ये उभारलेला दगडी स्तंभ मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात वाहनाने धडक देऊन पाडला. यामुळे या स्मृतीस्तंभाचे तीन तुकडे होवून विखुरला जावून विटंबना झाली. या ऐतिहासिक स्मृती स्तंभाच्या पुनर्वसना बाबत गेल्या दोन वर्षांपासून अधिकारी, लोकप्रतिनिधी पातळीवर केवळ चर्चा सुरू होती.



याबाबत अधिक माहिती अशी की, कल्याण विशाखापट्टण राष्ट्रीय महामार्गावर वळणावर ब्रिटिशांच्या काळात उभारलेला दगडी स्तंभ आहे. १९१४ ते १९१९ या कालावधीमध्ये महायुद्धात ज्यांनी कामगिरी बजावली त्या सैनिकांच्या गौरवार्थ असा स्तंभ ब्रिटिश कालापासून उभारण्यात आलेला आहे. या युद्धामध्ये ज्या ज्या मित्र राष्ट्रांनी सहभाग घेतला त्यात शहीद झालेल्या एकूण सैनिकांच्या स्मृती प्रित्यर्थ उभारलेला स्तंभ ब्रिटिश राजवट असल्यामुळे येथे उभारला जाऊन या स्तंभावर तालुक्यातील अथवा जिल्ह्यातील सहभागी सैनिकांचा कसलाही उल्लेख नाही. ज्या काळात स्तंभ उभारला गेला त्यावेळी पाथर्डीला शेवगाव तालुका होता. भारतीय स्वातंत्र्य युद्धाचा या स्तंभाचा कसलाही संबंध नसून महायुद्ध पूर्वीचा हा स्तंभ आहे. काळाच्या ओघात अतिक्रमणाने या स्तंभाला झाकण्याचे काम केले. व्यावसायिक दृष्ट्या अत्यंत मोक्याची जागा समजली जात असल्याने ते स्मारक अडथळा ठरत असावा म्हणून कोणीतरी हे कृत्य केले असावे, असा ही संशय व्यक्त होत आहे.

परिसरातील अनेक दुकाने व इमारतींमध्ये सीसीटीव्ही आहे तेथे फुटेजची तपासणी करून याबाबत अंदाज येऊ शकेल. काळाच्या ओघात चौथरा दबला गेला. उंच असल्यामुळे केवळ स्तंभ राहिला. अतिक्रमण हटविल्यानंतर त्यावरील कोरलेला मजकूर सर्व नागरिकांना सहजपणे वाचता येऊ लागला. या स्तंभाच्या सुशोभीकरणाबाबत मागील वर्षी आमदार मोनिका राजळे यांनी स्थानिक प्रशासनाला आदेशही दिले होते. तथापि महामार्ग विभागाला हा स्तंभ अडथळा ठरून अवजड वाहतुकीला त्रास होऊ शकतो म्हणून यासाठी अन्यत्र जागा घेऊन तेथे त्याची उभारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र त्याचीही अंमलबजावणी झाली नाही. पालिका कार्यालया शेजारी ध्वजवंदनाच्या स्तंभा शेजारी याला सुरक्षितपणे ठेवले जाऊ शकत होते. मात्र त्यापूर्वीच वाहनाच्या धडकेने या स्तंभाचे तुकडे झाले. आज सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांना या स्तंभाची दुरावस्था दिसल्यानंतर अनेकांनी हळहळ व्यक्त केली.

सकाळी सैनिक कल्याण बोर्डा चे सदस्य, प्रमुख महसूल अधिकारी, पालिकेचे कर्मचारी, पोलीस कर्मचारी आदींनी या जागेची पाहणी केली. मात्र राष्ट्रीय महामार्ग विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यापैकी कोणी तक्रार द्यायची असा हद्दीचा वाद सुरू असल्याने सायंकाळी उशिरापर्यंत कोणीही तक्रार दिली नाही. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी या स्तंभाचे अवशेष जेसीबीच्या साह्याने हलवून सुरक्षितस्थळी नेले. स्तंभाचा अपघात झाला की घडवून आणला याबाबत उलट सुलट चर्चा सुरू असून गांभीर्याने तपास करावा, अशी मागणी होत आहे. दरम्यान हा स्तंभ पाडला गेल्याने महामार्ग विभागाचा अडथळा दूर झाल्याने त्या विभागाकडून तेथील रस्त्याचे काम कधी सुरू करण्यात येते. याकडे लोकांचे लक्ष लागले आहे. पालिका अतिक्रमण विरोधी पथक व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होऊन अतिक्रमणाबाबत अधिकाऱ्यांनी पालिकेचे लक्ष वेधले. स्तंभ हटल्याने आता तेथील वळण मोठे होऊन अवजड वाहनांना सहजपणे वाहने चालवता येतील, अशा पद्धतीने रस्ता मोठा करण्याचे नियोजन यापूर्वीच करण्यात आले होते.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समर कॅम्प हे पूरक माध्यम : अभय आव्हाड

**● पाथर्डी । वीरभूमी–**

सध्याच्या स्पर्धेच्या व ताणतणावाच्या युगामध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ व निरोगी असणे अतिशय महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये कलागुण व शारीरिक सुदृढता प्राप्त होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उन्हाळी सत्रात समर कॅम्प हे प्रभावी माध्यम ठरणार आहे असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.



पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान व श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने पार्थ समर कॅम्पचे आयोजन दि. २८ एप्रिल २०२५ ते ४ मे २०२५ या दरम्यान केले आहे. सदर समर कॅम्पमध्ये एरोबिक्स, योगा-प्राणायाम, बुद्धिबळ, आर्चरी, टेबलटेनिस, तायक्कांदो, कराटे, क्रिकेट, फुटबॉल यासारख्या खेळांचे मार्गदर्शन तसेच क्राफ्ट, कला, गायन, वादन, इंग्रजी व गणिती मनोरंजक खेळ, अबॅकस, बालसंस्कार इत्यादी ॲक्टिव्हिटीचे मार्गदर्शन तालुक्यातील उत्कृष्ट प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शन केले जात आहे. समर कॅम्प मध्ये आयोजकांकडून पोषक आहार देण्यात येत आहे.

पार्थ समर कॅम्पचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड, प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे, मुख्याध्यापक शरद मेढे,मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, प्राध्यापक विजय देशमुख, पर्यवेक्षक संपत घारे, इंजि. कुणाल आव्हाड, अंबादास साठे सर्व प्रशिक्षक तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते. विद्यालयातील शिक्षक संपत घारे, रावसाहेब मोरकर, दीपक राठोड, अनुजा कुलकर्णी, ऋषिकेश मुळे, सतीश डोळे, प्रमोद हंडाळ तसेच इतर शिक्षक परिश्रम घेत आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद मेढे यांनी केले तर सूत्रसंचालन अनुजा कुलकर्णी यांनी केले तर संपत घारे यांनी आभार मानले.

## फुले चित्रपट टॅक्स फ्री करून लाडक्या बहिणींना मोफत दाखवावा

**● नगर । वीरभूमी–**

देशात सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडविणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित फुले हा चित्रपट स्त्रियांना नवी प्रेरणा देणारा ठरणार आहे. हा चित्रपट सरकारने टॅक्स फ्री करावा व देशभरातील लाडक्या बहिणींना मोफत दाखवावा, अशी मागणी पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात यांनी केली आहे.

प्रकाश थोरात म्हणाले की, जगातील दुःख स्त्री-पुरुष विषमतेतून निर्माण झाले आहे. ही विषमता दूर करण्यासाठी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिले. दीडशे वर्षांपूर्वीच त्यांनी स्त्री व दलितांच्या शिक्षणासाठी संघर्ष करून सामाजिक न्यायाचा पाया घातला.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी देशात पहिल्यांदा मुलींसाठी शाळा सुरू केल्या आणि वाचनालयांचे जाळे उभारले. १८५४ मध्ये त्यांनी देशातील साक्षरता अभियानाची सुरुवात केली. विधवांच्या संगोपनासाठी १८६३ मध्ये स्वतःच्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. त्याचबरोबर सत्यशोधक समाजाची स्थापना करून हुंड्याशिवाय विवाहाची प्रथा रूढ केली. अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला करून जातिभेदाच्या विरोधात पहिले पाऊल उचलले. त्यांनी बालविवाह विरोधात आवाज उठवला आणि विधवांच्या पुनर्विवाहाला प्रतिष्ठा दिली. स्वतःच्या मुलाचा आंतरजातीय विवाह घडवून आणत जाती निर्मूलनाच्या चळवळीला स्वतःच्या घरातून सुरुवात केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची प्रेरणा आजच्या महिलांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या कार्याची गाथा फुले या चित्रपटात मांडली असून, तो प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे, असे प्रकाश थोरात यांनी सांगितले. या चित्रपटातून आजच्या महिलांना प्रेरणा व आत्मविश्वास वाढवणारी दिशा मिळेल आणि समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला नवे बळ मिळेल, असेही ते म्हणाले.

# भारतीय ज्ञान परंपरा अतिशय समृद्ध : डॉ. गणेश महाराज बडे

**● पाथर्डी । वीरभूमी–**

भारतीय परंपरेत ज्ञान आणि परंपरा तसेच कर्म आणि धर्म यांचा अद्भुत समन्वय आहे. ऋग्वेद काळापासूनच भारतीय शिक्षणपद्धतीने जीवनातील अध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथज्ञानाबरोबरच शारीरिक श्रमाचे महत्व देखील भारतीय ज्ञान परंपरेतून अधोरेखित होते. भारताने नेहमीच जगाला अध्यात्मिक बंधुता, योग आणि वेदांचे ज्ञान दिले आहे. ज्याचे अनुकरण आजही जागतिक समुदाय करत आहे, असे प्रतिपादन हभप. डॉ. गणेश महाराज बडे यांनी केले.



येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित नवीन शैक्षणिक धोरण कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड हे होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. बबन चौरे, डॉ. मंगेश वाघमारे, प्राचार्य अशोक दौंड, डॉ. जयश्री खेडकर, प्रा. शरद मेढे, समन्वयक डॉ. अशोक कानडे उपस्थित होते.

बडे महाराज म्हणाले, शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान वाढविण्यासाठी अध्यात्मिक व्यक्तींनी सर्वात जास्त प्रयत्न केले. ज्ञानेश्वरी हा फक्त अध्यात्मिक ग्रंथ नसून जीवनदर्शन घडविणारा ग्रंथ आहे. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे हे तत्वज्ञान आपल्याला प्राचीन ज्ञान परंपरा शिकविते. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मिमांसा, वेदांत या आस्तिक तसेच चार्वाक, बौद्ध आणि जैन या नास्तिक दर्शनांनी भारतीय ज्ञान परंपरा अतिशय समृद्ध झाली असून ज्ञान म्हणजेच अनुभव ही ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानाची केलेली व्याख्या समर्पक आहे. आपल्या बुद्धीला व्यापक स्वरूप देण्याचे काम भारतीय ज्ञान परंपरा करते असे ते शेवटी म्हणाले.

अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. मंगेश वाघमारे यांनी आपल्या व्याख्यानात भारतीय शैक्षणिक धोरणामुळे होणारे बदल अधोरेखित केले. ते म्हणाले, भारत सरकारने प्रशिक्षित मनुष्यबळ तयार होण्यासाठी व प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी युनोचे उद्दिष्ट समोर ठेऊन नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले. शिक्षणक्षेत्रातील अमुलाग्र बदल स्वीकारणे गरजेचे आहे. डॉ. जयश्री खेडकर यांनी आपल्या व्याख्यानात शालेय स्तरापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात होणाऱ्या शिक्षण स्तर रचना समजून सांगितल्या. डॉ. खेडकर म्हणाल्या, ६४ कुळांचे ज्ञान देणारी ज्ञानपरंपरा भारतात अस्तित्वात होती. या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून प्रत्येक मुलाच्या विशिष्ठ क्षमतांचा स्वीकार, ओळख आणि विकास यासाठी शिक्षक आणि पालकांना संवेदनशील करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या कार्यशाळेसाठी संपूर्ण पाथर्डी तालुक्यातील ९५ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील प्राचार्य मुख्याध्यापक आणि शिक्षक यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बबन चौरे, परिचय समन्वयक डॉ. अशोक कानडे, सुत्रसंचालन प्रा. शेखर ससाणे तर आभार प्रा. मन्सूर शेख यांनी मानले.

## अमर्यादित भक्ती करणारा खरा भाग्यवंत : रंजाळे महाराज

**● कोपरगाव । वीरभूमी–**

अंत:करणापासून भगवंताला आवाज दिला तर तो आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो म्हणजेच अमर्यादित भक्ती करणारा खरा भाग्यवंत असतो असे प्रतिपादन ह.भ.प. बाळासाहेब महाराज रंजाळे यांनी केले.

राहाता तालुक्यातील व महाराष्ट्रातील एकमेव श्रीहरिहरेश्वर मंदिर असलेले श्रीक्षेत्र शिंगवे येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचे चतुर्थ पुष्प गुंफतांना ते बोलत होते.



ते पुढे म्हणाले की, या मृत्युलोकात जे जे भगवंताला शरण गेले तेच खरे भाग्यवंत आहेत. ते मागेही तरले आहेत व पुढेही तरतील असा विश्वास आहे. भाग्य या शब्दाला दोन प्रत्यय लागतात ते वान आणि वंत. एखादी गोष्ट मर्यादित असेल तर तेथे वान हा प्रत्यय लागतो तर अमर्यादित असेल तर वंत हा प्रत्यय लागतो. एखाद्याकडे मर्यादित धन असेल तर त्याला धनवान म्हणतात आणि अमर्यादित असेल तर धनवंत म्हणतात. तसेच एखाद्याकडे मर्यादित गुण असतील तर तो गुणवान आणि अमर्यादित असतील तर तो गुणवंत समजला जातो. त्याचप्रमाणे मर्यादित भाग्य असेल तर भाग्यवान आणि अमर्यादित भाग्य असेल तर तो भाग्यवंत होतो. भाग्यवंतांचे कर्माचा, योगाचा, मोक्षाचा आणि भक्तीचा असे चार प्रकार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ज्ञानेश्वरी पारायणसाठी बसलेल्या एक महिला व पुरुष भाविकांना चिठ्ठी काढून दररोज एक ज्ञानेश्वरी ग्रंथ व व्यासपीठ भेट दिले जाते.

यावेळी आचार्य भगवान महाराज शास्त्री, हभप. संदिपान महाराज, साई कथाकार बाळकृष्ण महाराज सुरासे, गणेश महाराज शास्त्री, ऋषिकेश महाराज, हभप. शिंदे महाराज पुणे, हभप. कैलास महाराज पुणे, ह भ प चंद्रकांत महाराज गावडे पुणे, विठ्ठल महाराज पुणे, शिवाजी महाराज ठाकरे, दिनकर महाराज मोहीन, रामचंद्र महाराज सावंत, अमोल महाराज गाडे, उत्तम महाराज गाडे, गणेश महाराज मोरे, पांडुरंग महाराज चामे, राक्षे महाराज आळंदी, समाधान महाराज, प्रकाश महाराज गायकवाड आदीसह पंचक्रोशीतील गावातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप तसेच नियोजन करण्यासाठी शिंगवे येथील तरुण मित्र मंडळ व बजरंग दलातील स्वयंसेवक अथक परिश्रम घेत आहेत.

# मुळा नदीवरील मोरेवाडी धरणासाठी आपला पाठपुरावा

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात । साकुरसह पठार भागातील सभासदांचा स्नेहसंवाद मेळावा

**● संगमनेर । वीरभूमी–**
आमदारकी ही माझ्यासाठी नव्हती तर तुमच्या सगळ्यांसाठी होती. सगळ्या सहकारी संस्थांना संरक्षण देणारे आमदारकीचे कवच होते. तालुक्याच्या विकासाची वाटचाल व सहकार टिकवण्यासाठी यापुढे सर्वांना एकत्र राहावे लागणार असून मोरेवाडी धरण व्हावे ही आपली इच्छा होती. पुढील पाच वर्षात धरण पूर्ण करण्याची संकल्पना होती. ते धरण झाले पाहिजे अशी मागणी करताना मोरेवाडी धरणासाठी आपला पाठपुरावा कायम सुरू राहील, असे प्रतिपादन काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

साकूर येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सभासद व युवक हितचिंतकांसाठी आयोजित स्नेहसंवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी. व्यासपीठावर शेतकरी विकास मंडळाचे ज्येष्ठ नेते बाजारीव खेमनर, कारखान्याचे अध्यक्ष बाबा ओहोळ, सभापती शंकर खेमनर, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा जयश्री थोरात, गणपत सांगळे, पांडुरंग घुले, आर. बी. राहणे, विठ्ठल भागवत, इंद्रजीत खेमनर, ॲड. अशोक हजारे, साहेबराव बारवे यांच्यासह नवनिर्वाचित संचालक उपस्थित होते.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, विधानसभेच्या निवडणुकीनंतर अनेक अफवा पसरवल्या गेल्या. दिशाभूल केली. मात्र विधानसभेला बसलेल्या धक्क्यानंतर आपण साखर कारखान्याची विशेष काळजी घेतली. दोन महिने सभासदांशी थेट संपर्क साधला. यामुळे विरोधकांनाही जाणवले की, विधानसभेसारखी चूक कारखान्याच्या निवडणुकीत होणार नाही. सर्व सभासदांचा स्पष्ट निर्णय होता की, कारखाना शेतकरी विकास मंडळाकडेच राहायला हवा. आणि तुमच्या सर्वांच्या पाठिंब्यामुळे आज कारखान्याची निवडणूक बिनविरोध झाली, असे सांगत लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कार्यकर्त्यांचे आभार मानले. ही एकजूटच आपली खरी ताकद आहे. पुढेही आपल्याला अशाच प्रकारे संघटित राहून प्रत्येक आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे.

मोरेवाडी धरणाच्या गरजेवरही भर दिला. तुमच्या भागातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी मोरेवाडी येथे एक छोटेसे धरण व्हावे, ही माझी कल्पना होती. सर्वेक्षण देखील झाले होते. जर आपले सरकार सत्तेत आले असते, तर हे काम मार्गी लागले असते, असे ते म्हणाले. पिंपळगाव खांडसारखे मोठे धरण होऊ शकते, तर मोरेवाडी येथे का नाही? आता आपल्या सर्वांच्या दृष्टीने मोरेवाडी येथे धरण होणे अत्यावश्यक आहे. वेळप्रसंगी धरणासाठी आग्रह धरा. त्यांना श्रेय गेले तरी मला हरकत नाही, कारण माझा हेतू फक्त धरण व्हावे हाच आहे. पुढच्या शंभर पिढ्या तरी सुखी होतील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. या विषयात राजकारण न करता एकच ध्येय समोर ठेवा – धरण व्हावं आणि गावांचं भविष्य उज्ज्वल व्हावं, असे लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केले.



कारखान्याच्या प्रत्येक जागेसाठी पाच-पाच अर्ज दाखल झाले होते. निवडणूक बिनविरोध होणे सोपे नव्हते. मात्र अशा कठीण परिस्थितीतही आपण सर्वांनी एकमेकांवर विश्वास ठेवून, संवाद साधून, अखेर बिनविरोध निवडणूक साध्य केली, असे सांगून माजी मंत्री थोरात यांनी कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक केले. यासाठी तुम्ही सर्वांनी दाखवलेली साथ महत्वाची आहे. याच एकजुटीमुळे आपल्या कारखान्याचा आलेख आजपर्यंत चढताच राहिला आहे, असेही त्यांनी नमूद केले. यापुढे ऊस उत्पादन वाढवण्यासाठी नवनवीन प्रयोग करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी साकुर पठार भागातील विविध गावांमधील सभासद शेतकरी व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> निवडणुका जवळ आल्या की, काहीजण ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्त भाव देतात मात्र आपल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने पहिल्यापासूनच चांगला भाव दिला आहे. माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी नेहमीच सर्वांना बरोबर घेऊन काम केले आहे. तुम्ही चांगली साथ दिली आहे. याचबरोबर हजारो कुटुंब या साखर कारखान्यावर अवलंबून आहे. म्हणून हा सहकार टिकवण्याचे काम भविष्यात आपल्या सर्वांना करायचे आहे.
>
> **– डॉ. जयश्री थोरात,**
> अध्यक्षा, युवक काँग्रेस, संगमनेर

## स्वाभिमानीचे नगर जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे यांना ‘पद्मश्री डॉ. मनीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार’ प्रदान

**● शेवगाव । वीरभूमी–**
कृषी व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे यांना ‘पद्मश्री डॉ. मनीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

राष्ट्र हितासाठी समर्पित भावनेने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीपर सेवावृत्तींचा गौरव करण्यासाठी पद्मश्री डॉ. मनीभाई देसाई प्रतिष्ठान एन. वाय. के. क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय, निती आयोग भारत सरकार, तसेच एम.एस.एम.इ.उद्योग मंत्रालय भारत सरकार संलग्नित संस्थेच्या वतीने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. रविवार दि. २७ रोजी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक आणि प्रवचनकार डॉ.रविंद्र भोळे यांच्या हस्ते कृषी व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगीरी केल्याबद्दल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र भोळे यांनी राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवण्यास आणि राष्ट्रीय एकात्मतेचे जतन करण्यासाठी तसेच सामाजिक कार्याचे मूल्यमापन व प्रेरणा देण्यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे सागिंतले.

या समारंभास पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, आमदार राहुल कुल, आमदार अमोल जावळे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. या प्रसंगी शेवगाव तालुक्यातील एकनाथ घनवट, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे, मेजर अशोक भोसले, अमोल देवढे, अजित लवांडे, दादा ज्योतीक, रामनाथ घुगे, महेश थोरात, अनिल चेडे, अशोक गिरजे आदी शेतकरी उपस्थित होते.

## संजीवनी पॉलीटेक्निकच्या चार अभियंत्यांची ब्ल्यु स्टार इंडिया कंपनीत नोकरीसाठी निवड

**● कोपरगाव । वीरभूमी–**
संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्निकच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभागाच्या पूर्व तयारीने व संपर्काने अलिकडेच ब्लु स्टार इंडिया या घरगुती व आद्योगीक उपकरणे बनविणाऱ्या कंपनीने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करून अंतिम वर्षातील चार नावोदित अभियंत्यांची नोकरीसाठी निवड केली आहे. संजीवनी पॉलीटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांना ऊद्योगाभिमुख प्रशिक्षण देण्यात येते, त्याचे हे फलित आहे, यामुळे विद्यार्थी अनेक कंपन्यांच्या कसोटीत पात्र होत आहेत, अशी माहिती संजीवनी पॉलीटेक्निकच्या अधिकृत सुत्रांनी प्रसिदी पत्रकाद्वारे दिली आहे.



संजीवनी पॉलीटेक्निक मार्फत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या दुसऱ्या वर्षापासुनच त्यांना तीन पर्याय दिल्या जातात. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पुर्ण केल्यावर पहिला पर्याय म्हणजे नामांकीत कंपनित चांगल्या वार्षिक पॅकेजची नोकरी हवी आहे काय? दुसरा पर्याय उच्च शिक्षणासाठी जायचे आहे काय? आणि तिसरा पर्याय म्हणजे ऊद्योजक बनायचे आहे काय? वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांची वर्गवारी करून त्यांना प्रशिक्षित केल्या जाते. याचा परीपाक म्हणुन नोकरी अपेक्षित असलेल्या विद्यार्थ्यांना कंपनी निहाय अधिकचे प्रशिक्षण दिल्या जाते व वेगवेळया कंपन्या या टी अँड पी विभागाने केलेल्या समन्वयानुसार संस्थेत कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करतात.

यानुसार अलिकडेच ब्लु स्टार इंडिया कंपनीने घेतलेल्या कॅम्पस मुलाखतींमध्ये अंतिम वर्षातील मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या लकी रामदास शेलार, कृष्णा संजय आसणे, तुषार आबासाहेब वायसे व इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या गौरव अरूण पांडे यांची नोकरीसाठी निवड केली.

संजीवनीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या नवोदित अभियंत्यांच्या व पालकांचे अभिनंदन करून नवोदित अभियंत्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्राचार्य ए. आर. मिरीकर व टी अँड पी प्रमुख प्रा. आय. के. सय्यद यांचेही अभिनंदन केले.

# शंकर महाराजांचे कार्य हाच भक्ती व शक्तीचा अनोखा संगम

## पारस महाराज मुथ्था । शंकर महाराज मठातील मूर्ती स्थापना वर्धापनदिन साजरा

**● पाथर्डी । वीरभूमी–**
संतांचा प्रपंच म्हणजे ईश्वराकडे वैश्विक कल्याणाची प्रार्थना असते. सद्गुरु शंकर महाराजांचे कार्य हाच भक्ती व शक्तीचा अनोखा संगम असून अनेक लीला रचत त्यांनी साधकांना कल्याणाचा मार्ग दाखवला, संतांचा जन्मदिवस साजरा करणे म्हणजे त्यांच्या प्रती श्रद्धा, भक्ती, प्रेम व्यक्त करणे होय. असे मत संत चरित्राचे अभ्यासक हभप. पारस महाराज मुथ्था यांनी व्यक्त केले.

येथील शंकर महाराज मठातील शंकर महाराज यांच्या मूर्ती स्थापना वर्धापन दिन व मठाधिपती माधवबाबा यांचा अभिष्टचिंतन सोहळा असा कार्यक्रम शंकर महाराज भक्त मंडळ, माधवबाबा भक्त मंडळ, ताराबाई द्वारकादास बंग प्रतिष्ठान व रामनाथ बंग मित्र परिवाराच्या संयुक्त विद्यमाने कालिकादेवी मंगल कार्यालयात संपन्न झाला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड तर प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याचे मंगेशभाई ओझा, जालिंदर तारळकर व न्यायाधीश वैजयंती राऊत, कालभैरवनाथ मठाचे अध्यक्ष दादा मर्दाने, मोहन महाराज सुके, अमोल महाराज सोळसे, माजी उपनगराध्यक्षा दिपाली बंग यांच्यासह पुणे, ठाणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, नाशिक जिल्ह्यातून शंकर महाराज भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुथ्था महाराज म्हणाले, हिंदू धर्मामध्ये अवलीया संतांनी जाती-धर्माच्या नावाखाली अवडंबर न करता प्रबोधनकार्यातून साधकांना उपासना मार्गाची गोडी लावली. स्वामी समर्थांनंतर अवलिया परंपरेतले व दत्त संप्रदायाचे म्हणून शंकर महाराजांकडे पाहिले जाते. कर्मकांडा पेक्षा भक्ती मार्ग व त्यापेक्षा नामस्मरणातूनही ईश्वरी कृपा लवकर साध्य होते, अशी शिकवण दिली. पाथर्डी तालुका नाथ संप्रदाय व वारकरी संप्रदायाच्या वाटेवरून चालणारा तालुका असून शिर्डीचे साईबाबा, संत कवि दासगणू, शंकर महाराज यासह समकालीन अनेक संत महंतांचे वास्तव्य तालुक्यात झाले आहे. ईश्वरी आराधना हाच साधनेचा सरळ मार्गातून अनन्य भावाने परमेश्वराला शरण जा. अहंकार, स्वार्थ असे विविध विकार बाजूला ठेवा. सध्या समाजाच्या मजबूत बांधणीसाठी छत्रपतींची शक्ती व तुकोबाची भक्ती आवश्यक असून धर्मावर जागतिक पातळीवरून होणारे आक्रमण थोपवण्याची शक्ती परमेश्वराकडे मागा. धर्म हाच जगण्याचा शाश्वत आधार असून जातीभेद विसरून एका झेंड्याखाली व एक देशासाठी एकत्र या. सध्या देशात अस्थिरता माजवण्याचा प्रयत्न एका बाजूने तर दुसऱ्या बाजूने जातीभेद घडवून व अराजकता माजवत हिंदूंना कमकुवत बनवण्याचे षडयंत्र मोडून काढायचे असेल तर संत विचार व निस्वार्थ भाव मनात ठेवूनच काम करावे लागेल. धर्म जागवा, तो आपले रक्षण करीन. तालुक्यात माधवबाबांचे कार्य व जीवनशैली हाच एक धर्मग्रंथ असून सद्यस्थितीत वाचेवर सिद्धत्व प्राप्त झाल्याने त्यांची आध्यात्मिक उंची तालुक्याच्या धार्मिक वर्तुळाचे महात्म्य वाढवणारी ठरत आहे. पाथर्डीचा मठ अशा सर्व सकारात्मक चळवळींचा केंद्रबिंदू ठरवून लोकोपयोगी कार्य आणखी प्रभावीपणे करण्यासाठी या कार्याला लोक चळवळीचे स्वरूप यावे, असे महाराज म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन मुनोत, सूत्रसंचालन शंकर पंडित तर आभार मुख्य संयोजक रामनाथ बंग यांनी मानले. योगेश कलंत्री यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

## यशोधनच्या मैदानावर महाराष्ट्र दिनानिमित्त डॉ. अनिरुद्ध वनकर यांचा लाईव्ह कॉन्सर्ट

**● संगमनेर । वीरभूमी–**
काँग्रेसच्या राष्ट्रीय कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने गुरुवार दिनांक एक मे २०२५ रोजी सायंकाळी ७ वा. यशोधन कार्यालयाच्या मैदानावर संयुक्त जयंती महोत्सव सोहळा कार्यक्रमात डॉ. अनिरुद्ध वनकर यांचा लाईव्ह कॉन्सर्ट होणार असल्याची माहिती तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती सोहळा दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा होतो. यावर्षीही या संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त गुरुवार दिनांक १ मे २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता यशोधन जवळील मैदानावर संगमनेर काँग्रेस, युवा काँग्रेस, बहुजन विचार मंच, छत्रपती प्रतिष्ठान व विविध पुरोगामी संघटनांच्या वतीने महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक डॉ. अनिरुद्ध वनकर यांचा शिवराय ते भीमराव जागर महामानवांचा हा गीतांचा कार्यक्रम होणार आहे. प्रख्यात शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गीतांसह छत्रपती शिवाजी महाराज ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील विविध प्रबोधन पर गीतांचा कार्यक्रम लाईव्ह कॉन्सर्ट मधून यावेळी होणार आहे. यावेळी राज्यभरातील विविध गायकांसह १०० कलाकारांच्या संचात हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमासाठी भव्य दिव्य स्टेज, एलईडी, लाईट व्यवस्था, साऊंड सिस्टिम, सुमारे ४००० नागरिकांची बैठक व्यवस्था, महिला व पुरुष स्वतंत्र बैठक, पार्किंग व्यवस्था अशी सर्व अत्याधुनिक सुविधा करण्यात आली आहे. यावेळी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.